अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील उपसंचालक गट-अ (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या मुदतपूर्व / विनंतीवरुन बदल्यांबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन आदेश क्रमांकः बदली-१११९/प्र.क्र.३७/का.१४२७

मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ३१ मे, २०१९

शासन आदेश -

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ चे कलम ४(४) व ४(५) नुसार अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील उपसंचालक गट-अ (राजपत्रित) संवर्गातील खाली नमूद अधिकाऱ्यांची सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने बदली करण्यात येत असून त्यांची पदस्थापना स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नांव, पदनाम व सध्याचे कार्यालय	बदलीनंतरचे पदनाम व कार्यालय
(१)	(२)	(३)
१	श्री.विजय पुरणमल शिंदे, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा	जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास), मानव विकास समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदूरबार (रिक्त पदी)
२	श्रीमती मृ.अ.भूत, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया	जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास), मानव विकास समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा (श्रीमती का.प्र.नाखले यांच्या बदलीमुळे रिक्त झालेल्या पदावर)
३	श्री.वि.स.कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली	सहायक आयुक्त (मानव विकास), मानव विकास आयुक्तालय, औरंगाबाद (श्री.कि.प्र.गिरगावकर यांच्या बदलीमुळे रिक्त झालेल्या पदी)

२. संबंधित कार्यालय प्रमुखांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या पदाचा पदभार अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून या अधिकाऱ्यांना बदलीच्या पदावर रुजू होण्याकरीता तात्काळ कार्यमुक्त करावे तसेच कार्यमुक्तीनंतर संबंधित अधिकाऱ्यांनी बदली केलेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे व त्या पदाचा कार्यभार स्विकारावा.

३. बदली झालेले अधिकारी बदलीच्या कार्यालयात रुजू झाल्यानंतर त्यांनी तात्काळ संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याशी संपर्क साधून ई-प्रोफाईल अद्ययावत करण्याची कार्यवाही सात दिवसांच्या आत करावी. अद्ययावत केलेले ई-प्रोफाईल संबंधित कार्यालयाने संबंधित अधिकाऱ्याच्या त्या महिन्याच्या वेतन देयकासोबत कोषागार कार्यालयास सादर केल्याशिवाय त्यांचे वेतन देयक कोषागार कार्यालयाने पारित करु नये. तसेच, अद्ययावत ई-प्रोफाईलच्या प्रती संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय व शासनास पाठविण्यात याव्यात. ई-प्रोफाईल अद्ययावत करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमखांची राहील.

४. संबंधित कार्यालयप्रमुखांनी बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास कार्यमुक्त केल्याबाबतच्या व रुजू करुन घेतल्याच्या आदेशाची प्रत या विभागास अग्रेषित करावी

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक २०१९०५३११७२७०८७११६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRADNYA MAHALE

Digitally signed by PRADNYA MAHALE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=31c8683f52ccbefd97bce49983c4151d2caf1c185c657ea855ac85f31e5f681e, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f0b9244e8f45f12e0a399cd036d6d3767c67c8349951e3e5047b7469a24cdfb2, ou=PLANNING DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRADNYA MAHALE
Date: 2019.05.31 20:00:14 +05'30'

(प्रज्ञा महाले)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संबंधित अधिकारी (मार्फत - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

प्रत,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर.
२) मा. मुख्यमंत्री/मा. मंत्री (नियोजन)/ मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) विभागीय आयुक्त (सर्व)
४) आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, औरंगाबाद,
५) जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा/नंदूरबार/गोंदिया/ भंडारा/हिंगोली
६) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
७) सर्व सह सचिव/ उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय (सर्व)
९) जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती कार्यालय (सर्व)
१०) जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय (सर्व)
११) अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
१२) लेखा अधिकारी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई
१३) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, बुलढाणा / नंदूरबार /गोंदिया/ भंडारा/ हिंगोली
१४) निवड नस्ती.